पोलीस बातमी पत्र

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. THW/205/2016-2018


Website: www.policebatmipatra.com www.policebatmipatra.in

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 पाऊस कमी झाल्याने तापाची साथ मलेरिया, गॅस्ट्रोचे रुग्ण वाढले!

3 → फसलेली 'नोटबंदी'

फसलेल्या नोटबंदीनंतर पंतप्रधान कोणतं प्रायश्चित घेणार?' ← 4




# शिवसैनिक म्हणतात '...अजब तुझे सरकार'

**रत्नागिरी : कोकण हा सेनेचा बालेकिल्ला ही बिरुदावली निर्माण करण्यात तळागाळातील शिवसैनिकांचे मोठे योगदान आहे. मात्र, महामंडळ अध्यक्षपदांच्या निवडीमध्ये सेनेचे आमदार राजन साळवी, आमदार सदानंद चव्हाण, आमदार वैभव नाईक यांच्यासह अनेक निष्ठावंतांना डावलण्यात आल्याची भावना शिवसैनिकांमध्ये आहे. त्यामुळे सेनेतील निष्ठावंत सैनिकच आता 'अजब तुझे सरकार' म्हणत नाराजी व्यक्त करीत आहेत. निष्ठावंतांनी केवळ पालखीचे भोई म्हणूनच काम करावे का, असा सवाल केला जात असून, सेनेतील असंतोष उफाळून येण्याची शक्यता आहे.**



## महामंडळ वाटपात निष्ठावंत वाऱ्यावर

राज्य सरकारने महामंडळ पदाधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. ज्यांना मंत्रिमंडळात सामावून घेता आले नाही किंवा ज्यांची सेनेप्रती निष्ठा असल्यानेच 'नंतर पाहुया' या सेना नेत्यांच्या शब्दामुळे जे शांत राहीले आणि सैनिक म्हणून ज्यांनी हा निर्णय मान्य करीत आज ना उद्या संधी मिळेल, असे आपल्या मनाला समजावले, त्यांची यावेळीही सेनेच्या नेतृत्वाकडून घोर निराशा झाल्याची चर्चा शिवसैनिकांमध्येच रंगली आहे.

रत्नागिरीत बराच काळ शिवसेनेचे काम करणारे व सध्या राजापूरचे आमदार असलेले राजन साळवी हे सच्चे व लढवय्ये शिवसैनिक म्हणून ओळखले जातात. सध्या ते नाणारमधील रिफायनरी प्रकल्पाच्या विरोधात प्रकल्पग्रस्तांच्या खांद्याला खांदा लावून लढा देत आहेत. विधिमंडळात सातत्याने विविध प्रश्नांवर आवाज उठवणारे आमदार साळवी यांनी न्यायासाठी राजदंड पळविण्याचाही प्रयत्न केला. आपल्या लढवय्येपणामुळे संपूर्ण राज्यात आपली प्रतिमा निर्माण केलेले राजन साळवी यांनाही कधीतरी सत्तेतील चांगले पद मिळेल, ही त्यांच्या निष्ठावंत सहकारी व चाहत्यांची बऱ्याच काळापासूनची इच्छा आहे. मात्र, यावेळीही आमदार साळवींना डावलण्यात आल्याने कार्यकर्त्यांमध्ये संतापाची भावना आहे.

चिपळूणमध्ये सदानंद चव्हाण यांनीही पक्षाप्रती निष्ठा जपत राजकीय वादळ वाऱ्यामध्ये सेनेची साथ सोडलेली नाही. त्यांच्या कार्यकर्त्यांनाही गेल्या काही काळापासून चव्हाण यांना मंत्रिपद मिळावे, असे वाटत आहे. मात्र, मंत्रिपद दूरच साधे महामंडळही चव्हाण यांच्या नशिबी येऊ नये, याचे दुःख त्यांच्या

### नेतृत्त्वाबाबत नाराजी : निष्ठावंतांचा विसर!

राज्य विधानसभा व लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका पुढील वर्षी होत आहेत. त्याच्या वर्षभर आधी महामंडळ पदाधिकाऱ्यांची घोषणा सरकारने केली आहे. अर्थातच राज्याच्या सत्तेत सहभागी असलेल्या सेनेच्या नेतृत्त्वाकडून पदाधिकाऱ्यांची नावे मुख्यमंत्र्यांकडे पाठवली जातात. परंतु त्यामध्ये सेनानेतृत्त्वाला निष्ठावंतांचा विसर पडल्याची नाराजी सैनिकांमध्ये आहे. त्यामुळे येत्या विधानसभा व लोकसभा निवडणुकीत या नाराजीचे वेगळे पडसाद तर उमटणार नाहीत ना, अशी चर्चाही राजकीय वर्तुळात आहे.

उर्वरित पृष्ठ 2 वर




## धारावीत २७ वर्षीय गोविंदाचा मृत्यू

**सोमवारी सर्वत्र दहीहंडीचा उत्सव सुरु असताना या उत्सवाला गालबोट लागले. धारावीत थर रचताना चक्कर येऊन पडल्याने २७ वर्षीय अंकुश खंदारे याचा मुत्यू झाला. धारावी बाळ गोपाळ पथकाचा हा गोविंदा होता. सायन रुग्णालयात त्याच्यावर उपचार सुरु होते. या उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. अंकुशला सायन रुग्णालयात दाखल केल्यानंतर त्याला लगेच मृत घोषित करण्यात आले.**

दरम्यान, दहिहंडीसाठी मानवी मनोरे रचताना अनेक गोविंदा जखमी झाले असून यांपैकी ४० जणांवर विविध रुग्णालयांमध्ये उपचार सुरु आहेत. यात धारावीतील २७ वर्षाच्या अंकुश खंदारे या गोंविदाचा मृत्यू झाला आहे. पहिल्या थरावर असताना फिट आल्याने तो थरावरून खाली कोसळला. त्यानंतर त्याला रुग्णालयात दाखल केले होते. पण दाखल केल्यानंतर त्याला लगेच मृत घोषित करण्यात आले असल्याचे वृत्त आहे.

## अजूनही होऊ शकते युती
## जर भाजपाने दूर केली शिवसेनेची 'ही' भीती

**लोकसभेच्या महाराष्ट्रातील सर्वच्या सर्व ४८ जागा स्वबळावर लढवण्याचा जणू निर्धारच शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला आहे. तसा तर स्वबळाचा नारा त्यांनी काही महिन्यांपूर्वीच दिला होता, पण तरी लोकसभा निवडणुकीत ते भाजपाला, मोदी-शहांना सुखद धक्का देऊ शकतात आणि सेनेचाही फायदा करून घेऊ शकतात, अशी कुजबूज राजकीय वर्तुळात सुरू होती. मात्र, एक भीती युतीच्या वाटेत आडवी येत असल्याचं खात्रीलायक सूत्रांकडून समजतं.**




२०१९च्या लोकसभा निवडणुकीत 'एकीचं बळ' वापरण्याचे प्रयत्न विरोधकांनी सुरू केल्यानंतर भाजपाला आपल्या मित्रांची आठवण झाली आहे. सर्वात जुना मित्र असलेल्या शिवसेनेला गोंजारण्यासाठी अलीकडच्या काळात भाजपाध्यक्ष अमित शहा आणि खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही उद्धव ठाकरेंशी 'कानगोष्टी' केल्या. ही 'मिशन लोकसभे'ची मोर्चेबांधणीच होती. परंतु, लोकसभा निवडणुकीवेळी भाजपाचे नेते शिवसेनेला स्वार्थासाठी जवळ करतील आणि गरज सरल्यावर विधानसभेवेळी दूर लोटतील, अशी शंका शिवसेना नेतृत्वाला वाटते. त्यामुळे दोन्ही विधानसभा निवडणुकींचा फॉर्म्युला आधीच पक्का झाला आणि त्यात शिवसेनेला योग्य वाटा मिळाला, तर कदाचित युतीचं गणित जमूही शकेल, असं काही मंडळी खासगीत सांगतात. कारण, युती करायची की नाही, यावरूनही शिवसेनेत दोन गट असल्याचं समजतं.

दोन दिवसांपूर्वी उद्धव ठाकरे यांनी निवडणुकीच्या दृष्टीनं रणनीती आखण्यासाठी शिवसेना भवनात बैठक बोलावली होती. या बैठकीला दक्षिण मुंबई आणि मध्य मुंबई लोकसभा मतदार संघातील सर्व पदाधिकारी, खासदार, आमदार आणि नगरसेवकांनी हजेरी लावली होती. या बैठकीनंतर, शिवसेना लोकसभेच्या राज्यातील ४८ जागा लढवण्याच्या दृष्टीने तयारी करणार असल्याची माहिती

उर्वरित पृष्ठ 2 वर



## वर्दीतला बापमाणूस!
## पोलीस अधीक्षक मुलीला केला सलाम

वडील आणि मुलगी हे एक असं नातं आहे, ज्या नात्याविषयी बोलावं तितकं कमीच आहे. ज्या वडिलांना पाहून घरातल्यांचा थरकाप उडतो, ज्यांचा घरातच नव्हे तर बाहेरही चांगलाच दरारा असतो अशा बाबांशी मुलींचं नातं म्हणजे एखाद्या मित्राप्रमाणे असतं. आहे की नाही ही गंमत. असंच एक नातं सध्या अनेकांचच लक्ष वेधत आहे. मुख्य म्हणजे वडील- मुलीच्या या नात्याची सोशल मीडियावरही बऱ्यापैकी चर्चा सुरु आहे.

ही चर्चा आहे पोलीस उपायुक्त ए.आर. उमामहेश्वर सर्मा आणि त्यांची मुलगी सिंधू सर्मा यांच्याविषयीची. गेल्या तीन दशकांहून अधिक काळ उमामहेश्वर हे पोलीस खात्यात सेवेत आहेत. चार वर्षांपूर्वी त्यांच्या मुलीनेही पोलीस खात्यात प्रवेश केला. पण, रविवारी ज्यावेळी वडील-मुलीची ही जोडी प्रत्यक्षपणे समोर आली तेव्हा मात्र पोलीस उपायुक्त असणाऱ्या उमामहेश्वर यांनी त्यांच्या मुलीला सलाम केला. त्यांची मुलगी म्हणजेच सिंधू सर्मा ही तेलंगाणातील जगतियाल भागात पोलीस अधीक्षक म्हणून काम पाहते.

# दुसऱ्या राज्यात गेल्यावर आरक्षण मिळणार नाही - सुप्रीम कोर्ट

**नवी दिल्ली- अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती ला मिळणाऱ्या आरक्षणाबाबत सुप्रीम कोर्टाने एक महत्त्वपूर्ण आदेश काढला आहे. सुप्रीम कोर्टाने स्पष्ट केलंय की, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीचा लाभ घेणारे जर दुसऱ्या राज्यात स्थायिक झाले तर त्यांना तिथे आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही कारण प्रत्येक राज्यात आरक्षणाची परिस्थितीत वेगळी आहे असं कोर्टाने नमूद केलंय.**




जस्टिस रंजन गोगोई यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने सुप्रीम कोर्टाने मागे दिलेल्या एका निर्णयावर असहमती दर्शवली आहे. खंडपीठाने स्पष्ट केलंय की, कोणतीही हरकत न घेता अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या व्यक्तीला दुसऱ्या राज्यात गेल्यावर तोच दर्जा देता येणार नाही. या व्यक्तीने जर शिक्षण आणि नोकरीसाठी त्या राज्यात गेला असेल तर त्याला हा लाभ घेता येणार नाही.

राज्यघटनेत तरतूद केल्यानुसार, आरक्षणाचा लाभ हा राज्य आणि केंद्र शासित प्रदेशाची भौगोलिक सीमापर्यंत मर्यादित आहे. कोर्टाने स्पष्ट केलंय की, 'एससी/एसटी समाजातील व्यक्तींना भारतभर जर लाभ मिळत असेल तर राज्यात मर्यादित केलेल्या नियमांचं उल्लंघन होईल.' जर कोणत्या राज्यात एससी आणि एसटीच्या व्यक्तींना दिलेली मुभा ही देशभरात लागू झाली तर संविधान अनुच्छेद ३४१ आणि ३४२ विरोधात हा निर्णय राहिल. असे आरक्षण हे सरकारी नोकरी आणि सेवेत प्रतिनिधित्वाच्या आधारावर दिले जाते. शासकीय सेवेत सर्व पदांसाठी भरती ही अखिल भारतीय आधारावर आहे आणि आरक्षण संपूर्ण भारतात दिले जाते असंही कोर्टाने स्पष्ट केलं.

उर्वरित पृष्ठ 2 वर

## वडीलोपार्जित संपत्तीमध्ये मुलीचा हक्क अबाधितः
### न्यायमुर्ती उदय ललीत



**कोल्हापूर:** वडीलोपार्जित संपत्तीमध्ये हिंदु मुलीचा कायदेशीर हक्क समान आणि अबाधित आहे, असे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती उदय ललीत यांनी केले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि जिल्हा बार असोसएशनच्या संयुक्त विद्यमाने शाहु स्मारक भवन येथे आयोजित केलेल्या ॲड. अरविंद शहा स्मृति व्याख्यानमालेतील पहिले पुष्प गुंफताना न्यायमुर्ती उदय ललीत बोलत होते. या कार्यक्रमास मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमुर्ती जे. ए. पाटील, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश म. आ. लव्हेकर उपस्थित होते.

'हिंदु महिलेची सहहिस्सेदार म्हणून वडीलोपार्जित संपत्तीत असणारा हक्क व त्याची सध्याची कायदेशीर परिस्थिती' या विषयावर न्यायमुर्ती उदय ललीत म्हणाले, हिंदु वडिलोपार्जित संपत्तीमध्ये कर्ता कोण? महिला कर्ता होऊ शकते का? सध्या कुटुंबातील मोठी मुलगी समान सहहिस्सेदार असल्याने तिला मुलाइतकाच समान हक्क आहे. हिंदु स्त्री सुध्दा मग कर्ता का होऊ शकत नाही? दिल्ली उच्च न्यायालयाने एका न्याय निर्णयात स्पष्ट केले की, मोठी मुलगी ही सुध्दा हिंदु कुटुंबाची कर्ता होऊ शकते. आपण 'बेटी बचाओ-बेटी पढाओ'चा नारा देतो, अशा वेळी आपल्या मुली खुप महत्वाच्या आहेत. त्यामुळे त्यांना त्यांच्या हक्कापासून वंचित ठेऊ नका, असे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी ॲड. अरविंद शहा यांच्या आठवणींना उजाळा दिला.

# पाऊस कमी झाल्याने तापाची साथ
## मलेरिया, गॅस्ट्रोचे रुग्ण वाढले!

**मुंबई-** शहर-उपनगरात ऑगस्ट महिन्यात पावसाने ब्रेक घेतला आहे. परंतु, या कालावधीत वातावरणीय बदलांमुळे आजारांचे प्रमाण मात्र वाढले आहे. ऑगस्ट महिन्यात साथीच्या आजारांचे एकूण सात बळी गेले असून, मलेरिया आणि गॅस्ट्रोच्या रुग्णांत प्रचंड वाढ झाली आहे. त्यामुळे मुंबईकरांनी ताप अंगावर काढू नये, वेळीच लक्षणे ओळखून वैद्यकीय सल्ला घेण्याचे आवाहन पालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्याने केले आहे.

ऑगस्ट महिन्यात मलेरियाचे तब्बल ८०४ रुग्ण आढळले आहेत. तर गॅस्ट्रोच्या ६४५ रुग्णांची नोंद पालिकेच्या आरोग्य खात्याकडे झाली आहे. त्याखालोखाल डेंग्यू आणि हेपेटायटिसच्या रुग्णांचे प्रमाण अधिक आहे. याखेरीज ऑगस्ट महिन्यात डेंग्यूसदृश आजाराचे २ हजार ३१७ रुग्ण आढळले असून, त्यांच्यावर पालिकेच्या विविध रुग्णालयांत उपचार सुरू आहेत. ही संख्या २०१७ साली १ हजार



९३६ एवढी होती. ऑगस्ट महिन्यात डेंग्यूच्या बळीनंतर पालिका प्रशासनाने सी, एच/साऊथ आणि एफ/साऊथ विभागातील १ हजार १६९ घरांतील ६ हजार ७५२ व्यक्तींची तपासणी केली. यात सात जणांना ताप असल्याचे आढळले, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. तर १ हजार ५४ घरांत धूरफवारणी करण्यात आली. या विभागातील ५६८ घरांच्या तपासणीत चार घरांत डासांच्या अळया आढळल्या, त्या नष्ट करण्यात आल्या. तर लेप्टोच्या बळीनंतर एम/ईस्ट वॉर्डमध्ये १ हजार १२० घरांतील ३ हजार ६६० लोकसंख्येची तपासणी करण्यात आली, त्यात तिघांना ताप दिसून आला.

# घनकचरा व्यवस्थापनेतील उदासीनतेमुळे महाराष्ट्रात बांधकामांना बंदी

**मुंबई- घन कचरा व्यवस्थापनाबद्दल धोरण न आखल्यानं सर्वोच्च न्यायालयानं महाराष्ट्रासह अनेक राज्यांची कानउघाडणी केली आहे. कचरा व्यवस्थापनाबद्दल बहुतांश राज्यांची आणि केंद्रशासित प्रदेशांची भूमिका अतिशय निराशाजनक असल्याचं न्यायालयानं म्हटलं. महाराष्ट्रासह अनेक राज्यांनी अद्याप घन कचरा व्यवस्थापनासाठी कोणतंही धोरण आखलेलं नाही.**

त्याबद्दल न्यायालयानं तीव्र शब्दांमध्ये नाराजी व्यक्त केली. घन कचरा व्यवस्थापनासाठी धोरण न आखल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयानं महाराष्ट्रासह अनेक राज्यांमधील बांधकामांना स्थगिती दिली आहे. घन कचरा व्यवस्थापनाचं धोरण आखण्यात दिरंगाई करणाऱ्या सर्व राज्यांना न्यायालयानं ३-३ लाखांचा दंड ठोठावला आहे. राज्य सरकारांकडून प्रतिज्ञापत्रं सादर करण्यात न आल्यानं हा दंड ठोठावण्यात आला. लोकांनी अस्वच्छ वातावरणात आणि कचऱ्यात राहावं असं जर राज्य सरकारांना वाटत असेल, तर आम्ही काय करु शकतो, अशा शब्दांमध्ये न्यायालयानं नाराजी व्यक्त केली. 'महाराष्ट्र, मध्य प्रदेश, उत्तराखंड, चंदिगढ यांच्यासारख्या राज्यांनी घन कचरा व्यवस्थापनासाठी अद्याप धोरण आखलेलं नाही. दोन वर्षांपासून यासाठी आग्रह धरला



जात आहे. मात्र तरीही काही राज्यं याबद्दल उदासीन आहेत,' असं न्यायालयानं म्हटलं.

# घराघरांत शौचालय मोहीम अडचणीत; २,६८४ अर्ज फेटाळले

**मुंबई-** मुंबई हागणदारीमुक्त करण्याचा निर्धार महापालिकेने केला. त्यासाठी 'स्वच्छ भारत अभियानां'तर्गत मुंबईत घरोघरी शौचालय बांधण्यासाठी आर्थिक मदत करण्याची योजना आणण्यात आली. मात्र, केंद्राच्या धर्तीवर सुरू असलेल्या या योजनेंतर्गत आलेल्या तब्बल दोन हजार ६८४ अर्जांना महापालिकेने केराची टोपली दाखविली आहे. जागतिक दर्जाच्या मुंबई शहरात एकीकडे उत्तुंग इमारती असताना आजही झोपडपट्ट्यांमध्ये राहणारी कुटुंबे मूलभूत सुविधांपासूनही वंचित आहेत. सार्वजनिक शौचालयांअभावी रेल्वे रुळांवरच प्रात:विधी उरकण्याचे प्रमाण मुंबईत अधिक होते. त्यामुळे केंद्र सरकारच्या धर्तीवर घरोघरी शौचालय योजना तीन वर्षांपूर्वी



जाहीर झाली. योजनेंतर्गत प्रत्येक घरात शौचालय बांधण्यासाठी पाच हजार रुपये मदत मिळणार होती. त्यानुसार महापालिकेकडे घरात शौचालय बांधण्यासाठी १९ हजार ८९३ अर्ज आले होते. मात्र, महापालिकेच्या अटी व शर्तींचे पालन न करणाऱ्या अर्जांना नकार देण्यात आला आहे. असे तब्बल दोन हजार ६८४ अर्ज फेटाळण्यात आले आहेत. निकषांची पूर्तता न करणाऱ्या अर्जांना नाकारण्यात आले असल्याचे पालिकेच्या एका अधिकाऱ्याने सांगितले. च्स्वच्छ भारत अभियानांतर्गत केंद्र सरकारने ही योजना जाहीर केली होती. त्यानुसार महापालिकेने मुंबईतील सुमारे ७४० झोपडपट्ट्यांना या योजनेचा लाभ देण्याची तयारी दाखविली.

# नाणार विरोधकांचे गणगोत जमीन व्यवहारात गुंतलेले!

**मुंबई-** जाणार तेलशुद्धीकरण प्रकल्पाला राजकीय विरोध करणाऱ्या मंडळींचेच गणगोत या प्रकल्पाच्या परिसरातील स्थानिकांच्या जमिनीबाहेरील धनिकांना मिळवून देण्याच्या व्यवहारात गुंतलेले होते, असा गौप्यस्फोट भाजपचे माजी आमदार प्रमोद जठार यांनी मुंबईत पत्रकार परिषदेत केला. एक तर हा प्रकल्प वाईट असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पटवून द्यावे किंवा प्रकल्प चांगला असल्याचे पटवून घ्यावे. उगाच कोकणातील वातावरण खराब करू नये, असा टोलाही जठार यांनी शिवसेना नेते उद्धव ठाकरे व खासदार नारायण राणे यांना लगावला.

शिवसेना आणि नारायण राणे हे नाणार प्रकल्पाला विरोध करत आहेत. दोघेही भाजपचे सहकारी पक्ष या नात्याने सत्तेत भागीदार आहेत. त्यामुळे या दोघांना मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी संवाद साधणे सहज शक्य आहे. हा प्रकल्प वाईट असल्याचे या दोघांनी मुख्यमंत्र्यांना पटवून द्यावे किंवा प्रकल्प चांगला असल्याचे पटवून घ्यावे आणि ते कबूल करावे. या प्रकल्पावरून उगाच स्थानिकांच्या मनात गैरसमज तयार करून कोकणातील वातावरण खराब करू नये, असे जठार म्हणाले.



विजयदुर्ग येथे समुद्राची खोली १९ मीटरपेक्षा जास्त असल्याने तेथे मोठे बंदर व्हावे अशी मागणी आम्ही केंद्रीय बंदर विकासमंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली होती. त्यांनी ती मान्य केली. त्याच सुमारास अरब देशांतून कच्चे तेल आयात करणे सुलभ होईल अशा पश्चिम किनारपट्टीवरील ठिकाणाचा शोध सुरू होता. विजयदुर्गला मोठे बंदर होतच आहे तर त्याच्याच जवळपास जागा असल्यास चांगले होईल या विचारातून गुहागर आणि नाणार या दोन जागांची पाहणी झाली. पैकी नाणारवर शिक्कामोर्तब झाले, अशी माहितीही जठार यांनी दिली.

## थोडक्यात महत्वाचे

### निसगचित्रांनी रेखाटलेले डबे मध्य रेल्वेच्या ताफ्यात

**मुंबई-** दिवसभराच्या कामाच्या ताणासोबतच लोकल पकडण्यासाठी करावी लागणारी धावपळ, गर्दी आणि गोंगाट यामुळे हैराण झालेल्या मध्य रेल्वेच्या प्रवाशांचा प्रवास लवकरच निसर्गचित्रांनी नटलेल्या प्रसन्न डब्यांतून होणार आहे. हिरवी झाडे, गवत, फुलपाखरे आदी



निसर्ग चित्रे रेखाटलेले विशेष डबे मध्य रेल्वेवर धावणार असून पहिल्या टप्प्यामध्ये दोन डबे महिला प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार आहेत. रेल्वेच्या डब्यांमध्ये रंगसंगतीबाबत काही नियम ठरलेले आहेत. मात्र या नियमांना बाजूला सारत प्रवाशांचा विचार करून रंगसंगती वापरून लोकलच्या डब्यांचे रुपडे बदलण्यात आले आहे. माटुंगा येथील कार्यशाळेमध्ये हा नवीन प्रयोग साकारला आहे. कार्यशाळेतील अमोल धाबडे, चंदू अगुरु या प्रशिक्षणार्थी कर्मचाऱ्यांच्या कल्पकतेतून डब्यांमध्ये गुलाबी, हिरव्या रंगसंगतीचा वापर करून विविध आकाराची फुले, फुलपाखरे, गवत आदी आकर्षक चित्रे रेखाटण्यात आली आहेत. प्रवासातील ताण विसरून नवा उत्साह येण्यासाठी हे रंग पूरक असल्याने हा प्रयोग हाती घेण्यात आला आहे. पहिल्या टप्प्यामध्ये दोन डबे रंगविण्यात आले असून लवकरच महिला प्रवाशांसाठी सुरू करण्यात येतील.

### पनवेल-चिपळूण थेट रेल्वेसेवा; तिकीट फक्त 50 रूपये...!

**मुंबई-** गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्यांसाठी एक खूशखबर आहे. पनवेल-चिपळूणरेल्वेची डीएमयू सेवा ४ सप्टेंबरपासून सुरू होणार आहे. गणेशोत्सवानिमित्त ही रेल्वे सेवा सुरू करण्यात आली आहे. पनवेल रेल्वे स्थानक सल्लागार समितीच्या बैठकीत याबाबतची माहिती देण्यात आली. ४ सप्टेंबर ते ३० सप्टेंबरपर्यंत रेल्वे धावणार आहे. ही रेल्वे १२ डब्यांची असून यामध्ये एक प्रथम दर्जाचा आणि एक महिलांसाठी आरक्षित डबा असणार आहे. तसेच, या रेल्वेचे तिकिट आरक्षित नसून प्रवाशांना करंट बुकिंग करावे लागणार आहे. पनवेलमधील जुन्या रेल्वे स्थानकाच्या खिडकीवर प्रवाशांना तिकिटे उपलब्ध होतील. या रेल्वे प्रवासाचे



तिकीट फक्त ५० रूपये आहे. याचबरोबर, ही रेल्वे सकाळी ११ वा. १० मिनिटांनी सुटणार आहे. रोहा, कोलाड, इंदापूर, माणगाव, गोरेगाव रोड, वीर, सपे वामने, करंजाडी, विनहेरे, दिवानखावटी, खेड, अंजनी, चिपळूण आदी ठिकाणांहून प्रवास करीत त्याच दिवशी संध्याकाळी चिपळूणला ४ वा. पोहचेल. चिपळूणहून ही रेल्वे सायं. ५.३० वा. पनवेलकडे याच मार्गाने रात्री १०.३० वाजता पोहोचेल.

# भारतीय माओवाद्याचे रशिया व चीन कनेक्शन

**मुंबई-** नक्षलींशी असलेल्या संबंधांवरुन २९ ऑगस्ट रोजी पुणे पोलिसांनी देशभरात नऊ ठिकाणी छापे मारले होते. छाप्यामध्ये हजारो पत्रं मिळाली आहेत, ज्यामध्ये नक्षलवाद्यांना मदत होत होती, हे सिद्ध होते. या सर्व छाप्यांचे व्हिडिओ शुटींग केल्याचे पोलिसांनी सांगितले. पुणे पोलिसांनी मारलेल्या छाप्यामधून हजारो पत्रे मिळाली आहेत. या पत्रांमधून अनेक महत्त्वाची माहिती मिळाली आहे. यामध्ये भारतीय माओवाद्यांचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय माओवाद्यांशी संबंध होते आणि ते त्यांच्या सतत संपर्कात होते अशी माहिती पोलिसांनी दिली.

भारतीय माओवादी चीन, रशियासह अन्य देशांतील माओवाद्यांशी संपर्कात असल्याचे या पत्रातील माहितीवरून स्पष्ट होतेय. भारतीय माओवादी विदेशातील माओवाद्यांच्या सतत संपर्कात होते. भारतामध्ये मोठे षडयंत्र आखण्यात आले होते. यासाठी त्यांच्या विदेशातील माओवाद्यांसोबत भारताबाहेर बैठकाही झाल्या आहेत. त्यांची अशीच एक बैठक पॅरीस येथे झाल्याचे पत्राद्वारे स्पष्ट होते आहे. यामधून भारतात षडयंत्र रचण्यासाठी मोठी रसद आणि



शस्त्रसाठाही पुरवला जाणार होता. मिळालेल्या अनेक पत्रांमध्ये आर्थिक व्यवहारांची तसेच शस्त्रं खरेदी करण्याबाबत माहिती समोर आली आहे. पत्रांमध्ये अत्यंत खळबळजनक माहिती असून देशाविरूद्ध युद्ध पुकारणं, शस्त्रास्त्रांची खेरदी करणं आणि मोदी राज संपवण्यासाठी त्या शस्त्रांचा वापर करणं, राजीव गांधींची हत्या झाली त्यासारख्या घटनेची पुनरावृत्ती करणं असा अत्यंत खळबळजनक पुरावाच पोलिसांनी आज सादर केला. अशी हजारो पत्र पोलिसंच्या हाती लागली असून त्यातली मोजकीच पत्र आम्ही जाहीर करत आहोत अशी माहितीही सिंग यांनी दिली.

अतिरिक्त पोलिस महासंचालक परमवीर सिंग यांनी मुंबईत पत्रकार परिषद घेतली आणि पाचही माओवाद्यांवर केलेली कारवाई अत्यंत योग्य असून मोठ्या षडयंत्राचा पर्दाफाश केल्याचा दावा त्यांनी केला. वरवरा राव, अरूण परेरा, सुधा भारद्वाज, गौतम नवलखा व वर्नन गोन्साल्विस यांना झालेली अटक अत्यंत योग्य होती. परंतु सुप्रीम कोर्टाच्या आदेशावरून त्यांना स्थानबद्धतेत ठेवल्याचे ते म्हणाले.

# सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना दिलासा, मंडपांना परवानगी देण्याची मुदत राज्य सरकारने वाढवली

**मुंबई** - सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना राज्य सरकारने मोठा दिलासा दिला आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना मंडपांच्या परवानगीसाठीची मुदत सरकारने ५ सप्टेंबरपर्यंत वाढवली आहे. त्यामुळे अद्याप मंडपांना परवानगी न मिळालेल्या मंडळांना ५ सप्टेंबरपर्यंत परवानगी मिळवण्यासाठी अर्ज करता येणार आहे. महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या श्रीगणेशाच्या आगमनाला आता केवळ पंधरवडा उरला आहे. मात्र अद्यापही अनेक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना परवानगी मिळालेली नाही.

त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुंबई भाजपाध्यक्ष अशिष शेलार आणि सार्वजनिक गणेशोत्सव महासंघाचे पदाधिकारी यांची बैठक झाली. यावेळी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना दिलासा देताना राज्य सरकारने मंडपांच्या परवानगीसाठीची मुदत ५ सप्टेंबरपर्यंत वाढवली

मुंबई उच्च न्यायालयाच्या नियमांनुसार या वर्षी गणेशोत्सव मंडळांना मंडपासाठी ऑनलाइन परवानगी देण्यात येत आहे. गणेशोत्सव मंडळांची गैरसोय



टाळण्यासाठी हा प्रयोग सुरू करण्यात आला आहे. मात्र, तांत्रिक अडचणीमुळे ही प्रकिया संथगतीने सुरू असल्याने अर्जाची मुदत तिसऱ्यांदा वाढविण्यात आली आहे. यापूर्वी मंडळांना २ सप्टेंबरपर्यंत अर्ज करण्याची मुदत देण्यात आली होती.




# मोबाइल चोरांचा रेल्वे अड्डा!

**मुंबई - एके काळी पाकीटमारांमुळे कुप्रसिद्ध असलेल्या मुंबईच्या उपनगरी रेल्वेसेवेवर आता मोबाइल चोरीमुळे कलंक लागत आहे. २०१६पासून रेल्वेच्या तिन्ही मार्गावर तब्बल ४१ हजार ८८१ मोबाइल चोरीच्या तक्रारी दाखल झाल्या आहेत. याचा दिवसगणिक हिशेब करता दररोज सरासरी ४३ मोबाइल रेल्वेतून लंपास केले जात असल्याचे दिसून येते. रेल्वेच्या कळवा स्थानकात मोबाइल चोरीमुळे एका प्रवाशाला जीव गमवावा लागला. त्यामुळे मोबाइल चोरीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. प्रवाशांच्या पाकिटावर डल्ला मारण्याऐवजी प्रवासादरम्यान सदैव त्यांच्या हातात असलेल्या स्मार्टफोनकडे चोरट्यांची नजर वळली आहे.**

लोहमार्ग पोलिसांच्या आकडेवारीनुसार जानेवारी २०१६ पासून जुलै २०१८पर्यंत तिन्ही मार्गावर ४१ हजार ८८१ मोबाइल चोरीला गेल्याच्या तक्रारी दाखल झाल्या आहेत. बोरिवली, कुर्ला, ठाणे व वडाळा पोलीस ठाण्यात सर्वाधिक मोबाइल चोऱ्यांची नोंद झाली आहे. मात्र या काळात केवळ ४ हजार ९३७ मोबाइल चोरांच्या मुसक्या आवळण्यात यश आले आहे. पश्चिम, मध्य रेल्वे मुख्य मार्ग व हार्बरवर होणाऱ्या एकूण चोऱ्यांपैकी ९० टक्के चोऱ्या या मोबाइलच्या असल्याचे लोहमार्ग पोलीस सांगतात. लोकल प्रवासात, स्थानकात गर्दीतून चालताना चोरांकडून मोबाइल लंपास केले जातात. यासाठी अनेक शक्कल लढवण्यात येतात. तीन ते चार जणांचा ग्रुप बनवून प्रवाशाला बोलण्यात गुंतवून ठेवणे, लोकल प्रवासात डब्याजवळ उभे राहून प्रवास प्रवाशाच्या हातावर दोन स्थानकादरम्यान किंवा फलाटावर उभ्या असलेल्या चोरांकडून फटका मारून मोबाइल चोरणे किंवा पादचारी पूल, स्थानकात उभ्या असलेल्या एकट्या प्रवाशाला हेरून मोबाइल खेचून पळ काढण्याचे प्रकार केले जातात. लोकल डब्याच्या दरवाजाजवळ उभे राहून मोबाइलवर बोलू नका, असे आवाहन रेल्वे पोलिसांकडून केले जाते. तरीही याकडे प्रवासी दुर्लक्षच करतात. हेच हेरून चोरांकडून मोबाइल लंपास केला जातो. दोन स्थानकांदरम्यान रुळावर उभे राहूनही प्रवाशांच्या हातावर फटका मारून मोबाइल चोरला जातो.

# नाईलाजास्तव पडसलगीकर सांभाळणार पदभार

**मुंबई -** निष्कलंक, प्रामाणिक आणि निर्विवाद आयपीएस अधिकारी अशी ओळख असलेले राज्याचे विद्यमान पोलिस महासंचालक दत्ता पडसलगीकर. मुंबईचे माजी पोलीस आयुक्त आणि विद्यमान पोलीस महसंचालक दत्ता पडसलगीकर उद्या निवृत्त होणार होते. मात्र, त्यांच्या सेवाज्येष्ठतेचा उपयोग करुन घेण्यासाठी राज्य आणि केंद्र सरकारने त्यांना तीन - तीन महिन्यांची मुदतवाढ दिली आहे. मात्र, राज्यात सध्या सुरु असलेली परिस्थिती पाहता पडसलगीकर या मुदतवाढीकरिता नाखूष असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. जर पडसलगीकरांनी मुदतवाढ नाकारली असती तर त्यांना निवृत्त न होता राजीनामा द्यावा लागला असता, मात्र सलग ३० पेक्षा जास्त वर्ष सेवेत असलेल्या पडसलगीकरांना रीतसर निवृत्त होण्यासाठी निदान राज्य सरकारने दिलेली मुदतवाढ स्विकारावी



लागणार आहे. त्यामुळेच नाईलाजास्तव पडसलगीकर १ सप्टेंबरपासून वाढीव पदभार स्विकारत असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. राज्यात तसेच देशात सध्या नक्षलीविरोधातील कारवाई आणि कट्टर हिंदुत्ववाद्यांचे अटकसत्र जोरात सुरु आहे. या पार्श्वभूमीवर तपास सुरु असताना दत्ता पडसलगीकर यांच्यासारख्या निष्कलंक, प्रामाणिक आणि कर्तव्य कठोर असणाऱ्या अधिकाऱ्याच्या अनुभवाचा फायदा घेण्याची विनंती सरकारच्यावतीने करण्यात आली.

### घर देण्याच्या नावाखाली वनपालाकडून गरजूची फसवणूक, लाखो रुपयांचा गंडा

**मुंबई-** घर देण्याच्या नावाखाली संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वनपाल अरुण रसाळ याने लाखो रुपयांना फसवणूक केल्याची तक्रार कस्तुरबा मार्ग पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. मात्र याबाबत आरोपीवर कारवाई करण्यास पोलीस टाळाटाळ करीत असल्याने या प्रकरणाची चौकशी करण्याचे निवेदन केतन जाधव यांनी मुख्यमंत्री आणि पोलीस आयुक्तांना सादर केले आहे. या वनपालाने अन्य काही गरजूंचीही फसवणूक केल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. फेब्रुवारी २०१२मध्ये राष्ट्रीय उद्यानातील सिंहविहारातील वनपाल रसाळ याने जोगेश्वरी येथील वांद्रेकरवाडीत राहाणाऱ्या दत्ताराम जाधव यांना वनखात्याच्या जागेत १४ लाख ३० हजार रुपयांना घर देण्याचे आश्वासन देऊन त्यांच्याकडून ही रक्कम उकळली होती.

---------- (पृष्ठ 1 वरुन) ----------

### शिवसैनिक म्हणतात '...अजब तुझे सरकार'

सहकाऱ्यांना वाटते आहे. महामंडळाच्या झालेल्या नियुक्त्यांमध्ये निष्ठावंतांना वाऱ्यावर सोडल्याची तिखट प्रतिक्रियाही निष्ठावंतांमधून व्यक्त होत आहे.

शिवसेनेच्या कोकण बालेकिल्ल्यातील गडाचे शिलेदार असलेल्या साळवी, चव्हाण यांसारख्या अन्य निष्ठावंतांप्रमाणेच सेनेला रामराम ठोकल्यानंतर सिंधुदुर्ग जिल्ह्यात शिवसेनेचे नेतृत्व करीत मालवण मतदारसंघात माजी मुख्यमंत्री नारायण राणे यांचा पराभव करून विजयी झालेले व सातत्याने सिंधुदुर्ग जिल्ह्यात सेनेची पताका झळकवणारे आमदार वैभव नाईक हेसुध्दा निष्ठावंत शिवसैनिक म्हणूनच ओळखले जातात. मात्र, त्यांनाही सत्तेच्या पदांपासून डावलण्यात आल्याची भावना त्यांच्या चाहत्यांमध्ये आहे. या निष्ठावंतांना पक्षाने सत्तेची ताकद दिली असती, तर त्यांच्याकडून पक्षसंघटना मजबूत करण्याचे आणखी प्रयत्न झाले असते. परंतु निष्ठावंतांना वाऱ्यावरच सोडले जात असल्याचा अनुभव सातत्याने येत असल्याने सैनिकांनी निष्ठावंत राहावे काय, असा प्रश्न आता विचारला जात आहे.

### अजूनही होऊ शकते युती

समोर आली आहे. शिवसेनेचे सध्या १८ खासदार आहेत. त्यापैकी तीन मुंबईतील आहेत. स्वबळावर लढायचं झाल्यास त्यांना मुंबईत तीन जागांसाठी उमेदवार निवडावे लागतील. गणेशोत्सवानंतर उद्धव ठाकरे या निवड प्रक्रियेला सुरुवात करणार असल्याचं समजतंय. परंतु, गणपतीनंतर शिवसेना-भाजपामध्ये बेरजेचं गणितही मांडलं जाऊ शकतं, याकडेही राजकीय जाणकार लक्ष वेधतात. अर्थात, त्यासाठी गरज आहे ती भाजपाने शिवसेनेला विश्वासात घेण्याची. त्यांच्या मनातील रास्त भीती दूर करण्याची. कारण, २०१४ मध्ये एकट्या भाजपालाच २८२ जागा मिळाल्यानंतर त्यांनी रालोआतील मित्रांना खिजगणतीतच घेतलं नव्हतं. त्याचीच पुनरावृत्ती यावेळी होऊ नये, याची पुरेपूर काळजी शिवसेना घेईल.

शिवसेनेनं स्वबळाचा नारा दिल्यापासून भाजपाची नेतेमंडळी त्यांच्याशी जवळीक वाढवण्याचा प्रयत्न करताना दिसताहेत. याचाच अर्थ त्यांना शिवसेनेची आवश्यकता आहे असा होतो. त्यामुळे 'मोके पे चौका' मारण्याची नामी संधी उद्धव ठाकरे यांच्याकडे आहे. ते तिचं सोनं करतात का, यावर बऱ्याच गोष्टी ठरतील.

### दुसऱ्या राज्यात गेल्यावर आरक्षण मिळणार नाही - सुप्रीम कोर्ट

याआधीही २० मार्च २०१८ रोजी सुप्रीम कोर्टाने आपल्या निर्णयात अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यात बदल करण्याची सुचना दिली होती. त्यामुळे या प्रकरणात आरोपीची अटक टळणार होती. न्यायमूर्ती आदर्श गोयल आणि न्यायमूर्ती यू.यू. ललित यांच्या खंडपीठाने लोकप्रतिनिधींच्या विरोधात एससी आणि एसटी कायद्याअंतर्गत प्रकरणात अटकपूर्व जामीन देण्यास कोणतेही प्रतिबंध नाही असं नमूद केलं होतं. तसंच या कायद्याच्या अंतर्गत अटकेपूर्वी प्राथमिक चौकशी करण्यात यावी असे आदेशही कोर्टाने पोलिसांना दिले होते. त्यानंतर अॅट्रॉसिटी कायद्याला कोणताही हात न लावता जसा आहे तसाच कायदा कायम ठेवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय केंद्र सरकारने घेतला होता आणि केंद्र सरकारने अॅट्रॉसिटी कायद्यात कोणताही बदल करण्यास नकार देत सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाला आव्हान दिलं होतं.

## संपादकीय...




संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक

# फसलेली 'नोटबंदी'

नोटबंदीमुळे मोदी सरकारचे जे हसे झाले ते मोदी यांनीच ओढवून घेतले. जाहिरातबाजीच्या नादात नोटबंदीमुळे होणाऱ्या फायद्यांची मोठी जंत्री मोदींनी जनतेसमोर ठेवली. त्यातील फारच थोडी उद्दिष्टे सफल झाली. नोटबंदीमुळे रद्द केलेल्यांपैकी ९९ टक्के नोटा बँकेत परत आल्याचे रिझर्व्ह बँकेने अधिकृतरीत्या जाहीर केले. सरकारच्या हे पूर्वीच लक्षात आले होते. नोटबंदीनंतर तीनच महिन्यांनी इंडिया टुडेला दिलेल्या मुलाखतीत नरेंद्र मोदी यांनी याची कबुली दिली होती. मात्र, त्यानंतर नोटबंदीच्या यशापयशाबद्दल देशासमोर प्रामाणिक कबुलीजबाब देण्याचे मोदींनी टाळले. इथे ते चुकले. देशातील काळा पैसा बाहेर काढण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला, पण त्यात म्हणावे तसे यश आले नाही, अशी कबुली मोदींनी पूर्वीच दिली असती तर जनतेचा विश्वास वाढला असता.

नोटबंदीचा निर्णय मोदींनी स्वत:च्या वा भाजपच्या फायद्यासाठी घेतलेला नाही, हे जनतेला ठाऊक होते. जनतेचा हा विश्वास लक्षात घेऊन अर्थव्यवस्थेतील काळा पैसा दूर करण्याचा किंवा बाजारातील जास्तीत जास्त पैसा बँकेत आणण्याचा प्रयत्न म्हणून नोटबंदीकडे पाहावे, असे आवाहन मोदींना करता आले असते. देशाच्या अर्थव्यवस्थेतील ८६ टक्के पैसा आता बँकांत जमा झाल्याने हा पैसा कोणाचा, याची माहिती सरकारकडे आहे. ही नोटबंदीची जमेची बाजू. बँकेत जमा झालेली सर्व रक्कम स्वच्छ नाही. जमा झालेल्यापैकी तीन ते चार लाख कोटी रक्कम ही संशयास्पद आहे, असा सरकारी अंदाज आहे. ही सर्व खाती प्राप्तिकर खात्याने नि:पक्षपणे तपासली तर बराच काळा पैसा उघड होईल. पण यात दोन अडचणी आहेत. एक तर खात्यांची संख्या प्रचंड असल्याने हे सर्व व्यवहार तपासून काळा पैसा खणून काढण्यास प्राप्तिकर खात्याला कित्येक वर्षे लागतील. दुसरी अडचण म्हणजे अनेक गैरव्यवहार तुलनेने लहान रकमेचे असल्याने गैरव्यवहारात अडकलेल्या रकमेपेक्षा त्यावरील कारवाईचा खर्च जास्त येईल. याचा वेगळा अर्थ असा की लहान रकमेचे काळे व्यवहार करणाऱ्यांची संख्या देशात प्रचंड आहे. खरा काळा पैसा अशा कोट्यवधी लहान व्यवहारांमध्ये अडकलेला आहे व तो रोखण्यासाठी सुटसुटीत कररचना हाच मार्ग आहे. काळा पैसा हे शब्द आले की आपल्यासमोर मोठमोठे उद्योग, नेते वा सेलिब्रिटी येतात. पण ते काळा पैसा रोख रकमेत ठेवत नाहीत, तर विविध मार्गांनी गुंतवतात. हे मार्ग शोधणे भारतासारख्या खंडप्राय देशात जिकिरीचे आहे. त्यासाठी मोठे मनुष्यबळ लागेल, प्रशासकीय खर्च वाढेल आणि प्रशासकीय भ्रष्टाचाराला अधिक वाव मिळेल.काळ्या पैशाचे देशातील वास्तविक स्वरुप जनतेला सांगण्याची संधी नोटबंदीनंतर मोदींकडे होती. करचुकवेगिरी हे देशासमोरील सर्वात मोठे संकट आहे. आजपर्यंत कोणीही त्याबद्दल बोलत नव्हते. पण ते धाडस मोदी व जेटली यांनी दोन ते तीन वेळा दाखवले. पण त्याचा म्हणावा तसा पाठपुरावा केला नाही व करभरणा सुटसुटीत केला नाही. नोटबंदीनंतर कर जमा होण्यात वाढ झाली असली तरी तो जुलमाचा रामराम आहे. आपल्याला मिळणाऱ्या सोयी-सुविधा वाढवण्यासाठी कर भरणे आवश्यक आहे हे लोकांना अद्याप समजलेले नाही. बहुतांश जनतेचा कल कर चुकवण्याकडे असतो. नोटबंदीमुळे कर भरणाऱ्यांच्या संख्येत वाढ झाली असली तरी ती वाढ टिकून राहील, असे नाही. शेवटी, पैसा बँकेत येऊन तो कोणाचा हे कळले, यापलीकडे सध्या तरी नोटबंदीतून काही हाती लागलेले नाही. तेव्हा नोटबंदीचे गणित चुकले हे खरे. अर्थात नोटबंदीचे विरोधक ज्या अर्थाने पराचा कावळा करून गणित चुकले, असे म्हणतात तसे ते चुकलेले नाही, तर काळ्या पैशाच्या स्वरूपावरून चुकले आहे. अर्थव्यवस्था गाळात गेली या आरोपात काही तथ्य नाही. सहा महिने झटका बसला असला तरी नंतर व्यवहार सुरळीत झाले. अर्थव्यवस्था अडचणीत येण्याची कारणे जागतिक आहेत. जागतिक घडामोडी लक्षात घेऊन नोटबंदीचा निर्णय पुढे ढकलता आला असता. अर्थव्यवस्था चाचपडत असताना त्यात आणखी अडचणी उभ्या करणे हे चुकीचे होते. मोदी यांनी ती चूक केली, असे म्हणता येईल. अशी चूक होण्याचे एक कारण म्हणजे योग्य मार्गदर्शकाचा अभाव किंवा कुणाकडून मार्गदर्शन न घेण्याचा अहंकार. अर्थव्यवस्थेचे आरोग्य सुधारण्यासाठी नोटबंदी हा एक उपाय असतो. पण तो कधी, कोठे व कसा वापरावा याचा विवेक ठेवावा लागतो. तो न ठेवल्याने हा व्यवहार आतबट्ट्याचा झाला. यापेक्षा उद्योग क्षेत्राला चालना दिली असती तर जास्त फायदा झाला असता.






# नकारात्मक मतदान लोकशाहीला घातक

**बाद मतांची संख्या कमी होण्याची आवश्यकता असताना प्रत्यक्षात नकारात्मक मतदानामुळे ती संख्या मोठ्या प्रमाणामध्ये वाढत आहे. निवडणुकीमध्ये उमेदवारांचा जय-पराजय हे सकारात्मक मतदानावर ठरत असते. निवडणुकीमध्ये एकेका मताचे महत्त्व असते.**

अशा वेळी एका नकारात्मक मतामुळे अधिक वाईट उमेदवारही निवडून येऊ शकतो. त्याचप्रमाणे नकारात्मक मतदानामुळे ज्या पक्षाचे सरकार सत्तेवर येऊ नये, असे वाटते त्या पक्षाचे सरकार सत्तेवर येण्यास नकारात्मक मतदान साहाय्यभूत ठरू शकते.

'राज्यसभेच्या निवडणुकीत 'नोटा' म्हणजेच 'वरीलपैकी कोणीही नाही' हा मतदानाचा पर्याय वापरता येणार नाही,' असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने नुकताच दिला. राज्यसभेच्या निवडणुकीमध्ये 'नोटा'चा वापर करण्यासंबंधी निवडणूक आयोगाने २४ जानेवारी २०१४ रोजी जारी केलेली अधिसूचना रद्द केली आहे. काँग्रेसचे गुजरात विधानसभेतील मुख्य प्रतोद शैलेश परमार यांनी गेल्या वर्षी गुजरातमध्ये झालेल्या राज्यसभेच्या निवडणुकीच्या मतपत्रिकेवर 'नोटा'चा पर्याय उपलब्ध करून देणाऱ्या निवडणूक आयोगाच्या अधिसूचनेला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. त्यावर निर्णय देताना 'नोटा'चा वापर लोकसभा, विधानसभा आदींसाठी घेण्यात येणाऱ्या 'प्रत्यक्ष' निवडणुकीसाठी मतदारांना उपलब्ध करून दिलेला आहे. राज्यसभेसारख्या अप्रत्यक्ष निवडणुकीकरिता या पर्यायाचा वापर करता येणार नाही, हे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

**आयोगाचे म्हणणे अमान्य:** निवडणूक रिंगणात उतरलेल्या उमेदवारांपैकी एकही उमेदवार हा लोकप्रतिनिधी होण्यास पात्र नाही, असे जर मतदाराचे मत असेल तर त्याला ते मत व्यक्त करण्याचा अधिकार नकारात्मक मतदानाद्वारे देणे आवश्यक आहे. यासाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावर किंवा मतपत्रिकावर 'वरील पैकी कोणी नाही' असा पर्याय मतदारांना उपलब्ध करून द्यावा, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने २७ सप्टेंबर २०१३ रोजी मुख्य निवडणूक आयुक्तांना दिला होता.

सर्वोच्च न्यायालयाने 'नोटा'संबंधीच्या २०१३च्या निर्णयात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष निवडणुका असा कोणताही फरक केला नाही. त्यामुळे आम्ही राज्यसभेसाठी 'नोटा'चा पर्याय उपलब्ध करून देणारी अधिसूचना जारी केली होती, असे प्रतिपादन निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात केले होते. परंतु सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाचे सदरचे म्हणणे अमान्य करून राज्यसभेसारख्या अप्रत्यक्ष निवडणुकीमध्ये 'नोटा'चा पर्याय वापरता येणार नाही, हे स्पष्ट केले आहे.

**पक्षांतराला प्रोत्साहन:** राज्यसभेच्या निवडणुकीच्या वेळी मतदारांच्या मतांचे मूल्य निश्चित केलेले असते व ती मते हस्तांतरणीय असतात. मतदारांना पक्षादेशाचे पालन करणे बंधनकारक असते. सदरचे मतदान हे खुले असते व मतदाराने कोणत्या उमेदवारास मत दिले हे आपली मतपत्रिका पक्षाच्या नेमलेल्या प्रतिनिधीला दाखवावी लागते. मतदाराने पक्षाचा आदेश धुडकावून मतदान केल्यास त्या मतदारावर पक्षांतरबंदी कायद्यानुसार कारवाई केली जाते. राज्यसभेच्या निवडणुकीत 'नोटा'चा वापर



करण्यास परवानगी दिल्यास त्यामुळे पक्षांतर व भ्रष्टाचारास प्रोत्साहन मिळेल, म्हणून सर्वोच्च न्यायालयाने 'नोटा'चा वापर राज्यसभेच्या निवडणुकीसाठी करण्यास नकार दिला आहे. 'नोटा'चा वापर प्रत्यक्ष निवडणुकीसाठी करावयाचा आहे. राज्यसभेसारख्या अप्रत्यक्ष निवडणुकीमध्ये त्याला स्थान नाही. राज्यसभेसारख्या अप्रत्यक्ष निवडणुकीमध्ये 'नोटा'चा वापर करणे हे निवडणुकीच्या पावित्र्याला बाधक व हानिकारक आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने निकालपत्रात नमूद केले आहे.

**प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मतदान असा फरक नाही:** मुळात २०१३मध्ये सर्वोच्च न्यायालयाने 'नोटा'संबंधी दिलेल्या निकालात प्रत्यक्ष मतदान व अप्रत्यक्ष मतदान असा कोणताही फरक केलेला नव्हता. मतदान करण्याच्या अधिकारामध्ये मतदान न करण्याचा तसेच नकारात्मक मतदान करण्याच्या अधिकाराचाही समावेश होतो. त्यामुळे मतदारांना नकारात्मक मत देण्याचा अधिकार नाकारणे याचा अर्थ घटनेच्या अनुच्छेद १९(१)(अ) अन्वये नागरिकांना बहाल करण्यात आलेले अभिव्यक्ती स्वातंत्र्य व अनुच्छेद २१ नुसार प्रदान करण्यात आलेले सन्मानाने जीवन जगण्याचा मूलभूत हक्क नाकारण्यासारखे आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निकालपत्रात नमूद केलेले होते.

**मूलभूत अधिकार नव्हे:** मतदान करण्याचा अधिकार हा मूलभूत अधिकार नसून तो लोकप्रतिनिधित्व कायदा, १९५१ अन्वये मतदारांना प्रदान केलेला कायदेशीर अधिकार आहे. जर मतदानाचा अधिकार हा कायदेशीर अधिकार असेल तर नकारात्मक मतदान करणे हा मूलभूत अधिकार कसा असू शकतो? आपल्याकडे गुप्त मतदान पद्धत असल्यामुळे मतदाराने कोणत्या उमेदवाराला मत दिले, हे कोणालाही समजत नाही. त्यामुळे घटनेच्या अनुच्छेद १९(१)(अ) मध्ये अभिप्रेत असे ते अभिव्यक्ती स्वातंत्र्य नाही. निवडणुकीच्या निकालाद्वारे जनभावनेचे होणारे प्रगटीकरण ही सामूहिक अभिव्यक्ती आहे; परंतु मूलभूत अधिकार हे व्यक्तिगत अधिकार असतात, सामूहिक अधिकार नसतात, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. तसेच घटनेच्या अनुच्छेद १९(१)(अ)अन्वये बहाल करण्यात आलेले अभिव्यक्ती स्वातंत्र्य व अनुच्छेद २१ अन्वये प्रदान करण्यात आलेले जीवन जगण्याचे स्वातंत्र्य हे देशातील सर्व नागरिकांना बहाल करण्यात आलेले मूलभूत अधिकार आहेत. परंतु मतदानाचा अधिकार मात्र १८ वर्षांपेक्षा जास्त वय असणाऱ्या नागरिकांनाच देण्यात आलेला आहे. त्यामुळे देशातील काही नागरिकांना मूलभूत अधिकार आहेत व काही नागरिकांना (जवळपास ४५ कोटी) ते नाहीत, हे घटनेला मान्य नाही. त्यामुळे मूलभूत अधिकाराच्या आधारावर 'नोटा'संबंधी सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णयच मुळात चुकीचा आहे.

**निरर्थक व परिणामशून्य अधिकार:** नकारात्मक मतदानाचा निवडणुकीच्या निकालावर प्रत्यक्षात कोणताही परिणाम होत नाही. एखाद्या मतदारसंघात कोणत्याही उमेदवारापेक्षा 'नोटा'च्या पर्यायास सर्वात जास्त मते मिळाली तरी तेथे फेरनिवडणूक न होता तेथे क्रमांक दोनचा म्हणजेच सर्वात जास्त मते मिळवणारा उमेदवारच विजयी म्हणून घोषित केला जात असतो. त्यामुळे 'नोटा'संबंधीचा निर्णय सकृत्दर्शनी योग्य वाटत असला तरी प्रत्यक्षात तो अधिकार निरर्थक, परिणामशून्य, कुचकामी व निरुपयोगी आहे.

# महापालिकेच्या हलगर्जीमुळे इमारतींना तडे

**मीरा रोड- मीरा रोडच्या हटकेश भागातील ग्रीनवुड संकुलातील इमारतींना तडे जाऊन ती धोकादायक बनल्याने इमारती रिकाम्या करण्यात आल्या. इमारतींना लागूनच विकासकामे सुरू केलेल्या बहुमजली इमारतीच्या खोदकामामुळे या इमारतींना धोका निर्माण झाला असल्याची तक्रार रहिवाशांनी मीरा-भाईंदर महापालिकेकडे तीन महिन्यांपूर्वीच केली होती.**

परंतु या तक्रारींना महापालिका प्रशासनाकडून चक्क केराची टोपली दाखवण्यात आल्यामुळे या संकुलातील तब्बल ८० कुटुंबांवर बेघर होण्याची वेळ आली आहे. दरम्यान रहिवाशांच्या तक्रारीनंतर काशिमीरा पोलीस ठाण्यात विकासकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ग्रीनवुड संकुलात अमन, अमिताभ, माधुरी आणि शाहरुख अशा चार इमारतींमध्ये एकंदर ८० कुटुंबं राहतात. मंगळवारी सायंकाळी इमारतींना मोठ्या प्रमाणात तडे गेल्याचे तसेच तळ मजल्यावरील मुख्य सिमेंट-काँक्रीटचे खांबच खचल्याने या चारही इमारती रिकाम्या करण्यात आल्या. इमारतींना लागूनच लोढा बिल्डर या विकासकाच्या बहुमजली इमारतीचे काम सुरू आहे. इमारतीच्या पायासाठी यांत्रिक खोदकाम (पायलिंग) सुरू असल्याने त्याचे हादरे बसून इमारतींची ही अवस्था झाली असल्याचा आरोप रहिवाशांनी केला आहे. गेल्या सात ते आठ महिन्यांपासून या ठिकाणी खोदकाम सुरू आहे. हे काम रात्री उशिरापर्यंत सुरू राहात असल्याने सुरुवातीला रहिवाशांनी विकासकाकडे खोदकामाबाबत तक्रार केली. किमान पावसाळा संपेपर्यंत काम बंद करण्याची विनंती रहिवाशांनी केली, परंतु त्यानंतरही काम सुरूच राहिले होते. या कालावधीत इमारतींना तडे जाऊ लागल्याचे रहिवाशांनी विकासकाच्या लक्षात आणून दिल्यानंतर विकासकाने



इमारतीचे संरचात्मक लेखापरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) केले. त्यात इमारत सुरक्षित असल्याचा अहवाल आल्याचे विकासकाचे म्हणणे होते, परंतु त्यावर विश्वास नसल्याने रहिवाशांनी स्वत:च इमारतींचे लेखापरीक्षण केले, त्यात खोदकाम असेच चालू राहिले तर इमारतींना धोका निर्माण होऊ शकतो, असे स्पष्ट झाल्याची माहिती स्थानिक रहिवासी अजिझ मोहम्मद हसोळकर यांनी दिली.

त्यानंतर जून महिन्यात रहिवाशांनी मीरा-भाईंदर महापालिका आणि काशिमीरा पोलीस ठाणे या ठिकाणी रीतसर लेखी तक्रार नोंदवली. लोढा बिल्डरच्या कामामुळे इमारतीला धोका निर्माण झाला असून इमारती कधीही कोसळून जीवितहानी होऊ शकते. त्यामुळे विकासकावर त्वरित कारवाई करावी, अशी मागणी रहिवाशांनी केली. या तक्रारीवर वारंवार पाठपुरावा करण्यात आला. परंतु महापालिका अधिकाऱ्यांनी थातुरमातुर उत्तरे देऊन रहिवाशांची बोळवण केली, असे लता पुनावासी यांनी सांगितले.

# विरार-वैतरणा प्रवास महिला प्रवाशांसाठी धोकादायक

## चोरींचे प्रमाण वाढले; पाच वर्षांत ११२ घटना, ३९ लाखांवर डल्ला

**विरार-** रेल्वे पोलिसांकडून महिला प्रवाशांच्या सुरक्षेचे दावे केले जात असले तर प्रत्यक्षात महिला प्रवाशांना चोरांकडून लुटण्याचे प्रमाण वाढले आहे. पश्चिम रेल्वेच्या विरार आणि वैतरणा या लगतच्या दोन स्थानकांतच गेल्या पाच वर्षांत महिलांच्या डब्यात चोरीच्या ११२ घटना घडल्या आहेत. त्याच चोरांनी महिलांच्या ३९ लाख रुपयांच्या ऐवजावर डल्ला मारलेला आहे.

रेल्वेत भुरटे चोर सक्रिय असतात. गर्दीचा फायदा घेऊन प्रवाशांचे पाकीट मारणे, मोबाइल चोरणे, मंगळसूत्र चोरणे आदी गुन्हे केले जातात. गेल्या काही वर्षांत विरार आणि त्यानंतर येणाऱ्या वैतरणा या स्थानकांदरम्यान महिलांच्या डब्यात चोरीच्या ११२ घटना घडल्या आहेत. एका सामाजिक कार्यकर्त्यांने माहिती अधिकारात रेल्वे पोलिसांकडून मिळवलेल्या माहितीद्वारे ही बाब उघडकीस आली आहे. २०१३ या वर्षांत १२ चोरीच्या घटना घडल्या असून त्यापैकी ९ गुन्हे उघडकीस आले आहेत. २०१४ या वर्षांत २० चोरीच्या घटना घडल्या असून त्यांपैकी आठ गुन्हे उघडकीस आले आहेत. २०१५ या वर्षांत सात चोरीच्या घटना घडल्या असून त्यापैकी तीन गुन्हे उघडकीस आले आहेत. २०१६ या वर्षांत पाच चोरीच्या घटना घडल्या असून त्यांपैकी दोन गुन्हे उघडकीस आले आहेत. २०१७ या वर्षांत ३० चोरीच्या घटना घडल्या असून त्यांपैकी दोन गुन्हे उघडकीस आले आहेत. २०१८ या वर्षांत जुलै महिन्यापर्यंत ३८ चोरीच्या घटना घडल्या असून त्यांपैकी दोन गुन्हे उघडकीस आले आहेत. या सर्व प्रकरणांत तब्बल ३९ लाख रुपयांचा ऐवज लुटण्यात आला आहे. पोलिसांनी तपास करून या ११२ गुन्ह्यांपैकी २६ गुन्हे उघडकीस आणले आहेत. वाढत्या चोरीबद्दल महिला प्रवाशांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे. रेल्वे पोलिसांनी



मात्र महिलांच्या सुरक्षेत कसलीच कसूर नसल्याचे सांगितले आहे. आम्ही भुरट्या चोऱ्या करणाऱ्या अनेक टोळ्यांना पकडले आहे. चालू वर्षांतच आम्ही ३०० भुरट्या चोरांना अटक केली, अशी माहिती वसई रेल्वे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विलास चौगुले यांनी दिली.

# बळजबरी वर्गणी गोळा केल्यास खंडणीचा गुन्हा दाखल होणार

**ठाणे-** गणेशोत्सव मंडळांनी वर्गणी मागण्यासाठी बळजबरी केल्याची तक्रार आल्यास खंडणीचा गुन्हा दाखल करण्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे. शिवाय ध्वनिप्रदूषण टाळण्यासाठी डीजे,



डॉल्बीला मनाई करतानाच पारंपरिक वाद्येही आवाजाच्या मर्यादेत वाजवा अशी तंबी दिली आहे. सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करणारी मंडळे तसेच वसाहती, चाळ कमिटी यांनी वर्गणी गोळा करण्याआधी धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी व मंजुरी घेणे बंधनकारक आहे. शिवाय वर्गणी गोळा करण्यासाठी नागरिक, व्यापाऱ्यांसोबत बळजबरी करू नये असे आवाहन सहायक अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी केले आहे. उत्सव साजरा करताना बहुतांश मंडळांकडून धर्मादाय आयुक्तांकडून नोंदणी वा परवानगी घेतली जात नाही. तसेच नागरिक, व्यापाऱ्यांना अनेकवेळा वर्गणीसाठी दमदाटी व जबरदस्ती केली जाते. याआधी काही प्रकरणात मंडळांच्या पदाधिकाऱ्यांवर खंडणीचा गुन्हाही दाखल केला गेला आहे. त्यामुळे मनमानी वर्गणी मागणे मंडळ वा वसाहत, चाळ समित्यांना अडचणीचे ठरणार आहे. मंडळांनी नोंदणी करून व सर्व परवानगी घेऊनच उत्सव साजरा करावा असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

# अनधिकृत इमारती तहानलेल्याच

**वसई-** वसई-विरार शहरात अतिरिक्त शंभर दशलक्ष लिटर पाणी आले असून नळ जोडणी देण्याचे काम सुरू आहे. मात्र जे रहिवासी अनधिकृत इमारतीत राहतात त्यांना सध्या नळजोडणीतून वगळण्यात आले आहे. बिल्डरांनी आमची फसवणूक केली मग आमचा काय दोष, असा सवाल या अनधिकृत इमारतीत राहणाऱ्या रहिवाशांनी केला आहे.

वसई-विरार शहरात सूर्याच्या दुसऱ्या टप्प्यातील शंभर दशलक्ष लिटर पाणी शहरात आले आहे. या पाण्याच्या वितरणासाठी शहरात जलवाहिन्या टाकण्याचे काम सुरू आहे. परंतु हे पाणी केवळ अधिकृत इमारतींनाच देण्याची भूमिका महापालिकेने घेतली होती. सध्या पालिकेने प्रतीक्षा यादीतील अधिकृत आणि भोगवटा प्रमाणपत्र मिळालेल्या इमारतींनाच नवीन नळ जोडण्या देण्यास सुरुवात केली आहे. मात्र अनधिकृत इमारतींमधील रहिवाशांना अद्यापही नळ जोडणी देण्याचा निर्णय झालेला नाही.



सूर्याच्या पाण्याच्या वितरणाचे काम सुरू आहे. त्यामुळे या अनधिकृत इमारतींमध्ये राहणाऱ्या नागरिकांनाही पाणी द्यावे, अशी मागणी काही नगरसेवकांनी केली होती. परंतु आयुक्तांनी अधिकृत इमारतींनाच नळजोडण्या देण्याला प्राधान्य दिले होते. अनधिकृत इमारतींपैकी काही इमारतींना घरपट्टी लावण्यात आलेली आहे. मात्र नळजोडण्या नाहीत. या इमारतीच्या रहिवाशांची नावे मतदार यादीत आहेत, परंतु त्यांना पाणी नाही अशी परिस्थिती निर्माण झाली होती.

वसईचे आमदार आणि सत्ताधारी पक्षाचे सर्वेसर्वा हितेंद्र ठाकूर आणि महापौर रुपेश जाधव यांनी अनधिकृत इमारतींनाही नळजोडण्या देण्याचे आश्वासन जाहीर सभेत दिले होते.

मात्र अद्याप त्यांची अंमलबजावणी झालेली नाही. अनधिकृत इमारतीत राहणाऱ्या रहिवाशांना बिल्डरांनी फसवलेले असते. पालिका त्यांच्याकडून कर घेते आणि इतर सोयीसुविधा देते.

# नालासोपाऱ्यात रुग्णांच्या जीवाशी खेळ; ६ बोगस डॉक्टरांना अटक

**नालासोपारा-** शहरातील बोगस डॉक्टरांविरोधात पालिकेच्या आरोग्य विभागाने जोरदार मोहीम उघडली आहे. नालासोपारा येथून ६ बोगस डॉक्टरांना अटक करण्यात आलेली आहे. त्यांपैकी एक डॉक्टर पळून जाण्यात यशस्वी ठरला आहे. या डॉक्टरांकडे कुठल्याच प्रकारचे वैद्यकीय शिक्षण नव्हते. बंदी असलेले, हानिकारक औषधे ते रुग्णांना देत असल्याचे चौकशीत आढळून आले आहे. संजकुमार सिंग (संतोष भुवन), सभजीत गौतम (संतोष भुवन), दुधनाथ यादव (श्रीराम नगर), मनोज गुप्ता (कारगिल नगर), कृष्णचंद्र पाल (संतोष भुवन) आणि रामजित पाल (कारगिल नगर) अशी ताब्यात घेण्यात आलेल्या या बोगस डॉक्टरांची नावे आहेत. गेल्या काही महिन्यांपासून पालिकेची बोगस डॉक्टरांविरोधातील मोहीम थंडावली होती. त्यामुळे अनेक बोगस



डॉक्टरांनी आपापली दुकाने थाटली होती. वैद्यकीय व्यवसाय करण्यासाठी महाराष्ट्र मेडीकल काऊन्सिलची परवागनी आवश्यक असते. मात्र, कुठल्याही परवानगी आणि नोंदणीशिवाय हे डॉक्टर व्यवसाय करीत होते. गुरूवारी पालिकेच्या आरोग्य विभागाने नालासोपारा येथे डॉक्टरांच्या दवाखान्यात जाऊन तपासणी केली. त्यावेळी ६ बोगस डॉक्टर आढळून आले.

# महागाईचा पुन्हा भडका उडणार!

## सीएनजी, वीज महागणार?

**नवी दिल्ली- केंद्र सरकार सामान्यांना महागाईच्या खाईत लोटण्याचे संकेत दिलेत. ऑक्टोबर महिन्यापासून सीएनजी, वीज दर महागण्याची शक्यता आहे. परदेशी बाजारातील तेजीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार देशांतर्गत उत्पादित नैसर्गिक वायूच्या किंमती १४ टक्क्यांनी वाढवण्याची शक्यता आहे. या निर्णयामुळे किरकोळ सीएनजी, वीज आणि यूरिया उत्पादन खर्चात वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे महागाईला आमंत्रण मिळण्याचे संकेत आहेत.**



नैसर्गिक वायूच्या घरगुती उत्पादकांना सध्या ३.६ डॉलर प्रति युनिट एमएमबीटीयू किंमत मिळत आहे. ऑक्टोबरमध्ये या किमतीत १४ टक्क्यांची वाढ होण्याची शक्यता आहे. नैसर्गिक वायूच्या किमतींचा दर सहा महिन्यांनी आढावा घेतला जातो. त्यानंतर ठरविण्यात येणारे नवे दर अतिरिक्त वायू उपलब्ध असलेल्या अमेरिका, रशिया आणि कॅनडा या देशांच्या केंद्रांवर प्रचलित दरांच्या सरासरीवर अवलंबून असतात. त्यामुळे यावेळी वायूचे दर वाढण्याची दाट शक्यता आहे, अशी सूत्रांनी माहिती आहे.

नव्या दरांची घोषणा येत्या २८ सप्टेंबरला होण्याची शक्यता आहे. भारताला आवश्यक असलेल्या वायूपैकी ५० टक्के वायू आयात केला जातो. या वायूची किंमत घरगुती गॅसच्या किंमतीच्या दुप्पट असते. घरगुती गॅसचे नवे दर येत्या १ ऑक्टोबरपासून पुढील ६ महिन्यांसाठी असणार आहेत. हे नवे दर ऑक्टोबर २०१५ पासून ते मार्च, २०१६ या कालावधीतील दरांच्या तुलनेत सर्वाधिक दर असणार आहेत. नैसर्गिक वायूचे दर वाढण्याने ओएनजीसी आणि रिलायन्स इंडस्ट्रीजच्या मिळकतीत वाढ होणार आहे. तथापि, यात सीएनजीचाही दर वाढणार आहे. बरोबरच यामुळे यूरिया आणि वीजेच्या उत्पादन खर्चात देखील वाढ होण्याची शक्यता आहे.

# फसलेल्या नोटबंदीनंतर पंतप्रधान कोणतं प्रायश्चित घेणार?'

**मुंबई-** नोटबंदीच्या निर्णयानंतर रिझर्व्ह बँकेत जवळपास सगळ्याच नोटा परत आल्याचं वार्षिक अहवाल प्रसिद्ध झाल्यावर मोदी सरकारवर चौफेर टीका सुरू झाली आहे. शिवसेनेचं मुखपत्र सामनाच्या अग्रलेखातून जोरदार टीकास्त्र सोडण्यात आलंय. सामनाच्या अग्रलेखात रिझर्व्ह बँकेला झिंगलेल्या माकडाची उपमा देण्यात आलीय. नोटबंदीच्या निर्णयानंतर ५० दिवसात परिस्थिती सुधारली नाही, तर भर चौकात जी शिक्षा द्याल ती भोगेन असं मोदींनी म्हटलं होतं. त्यामुळे सपशेल फसलेल्या नोटबंदीनं आता पंतप्रधान कोणते प्रायश्चित्त घेणार आहेत? असा प्रश्नही सामनाच्या अग्रलेखात विचारण्यात आलाय.



रिझर्व्ह बँक ही देशाच्या अर्थव्यवस्थेची संरक्षक असते. विद्यमान राजवटीत रिझर्व्ह बँकेचे झिंगलेले माकड झाले आहे. नोटाबंदीच्या निमित्ताने देशप्रेमाचे धडे देण्यासाठी 'भगतगण' पुढे पुढे करीत होते. मात्र 'झिंगलेल्या माकडा'लाही नोटाबंदीचे 'सत्य' लपवणे अवघड झाले आणि हे 'वास्तव' त्याच्या अहवालातून समोर आले. नोटाबंदी हा फियास्कोच होता हे 'झिंगलेल्या माकडा'नेच मान्य केले आहे. झिंगलेल्या माकडाची ही गोष्ट आहे. ती लिहिणे इसापलाही जमले नसते, असं अग्रलेखाच्या मथळ्यात म्हटलं गेलंय. तर सपशेल फसलेल्या नोटाबंदीने देशाला आर्थिक अराजकात ढकलले.



त्यामुळे देशाला दिलेल्या वचनास जागून पंतप्रधान मोदी हे आता कोणते प्रायश्चित्त घेणार आहेत? असा प्रश्नही यातून विचारण्यात आलाय. नोटाबंदी' हा अघोरी प्रयोग होता व त्यामुळे देशाचे सवादोन लाख कोटींचे नुकसान झाले. हा भ्रष्टाचार आहे. देशाच्या तिजोरीची लूट आहे व रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरनी ही लूट रोखली नाही म्हणून त्यांना न्यायासनासमोर उभे केले पाहिजे.

## एका माणसाच्या हट्टापायी नुकसान झाले,राज ठाकरेंची मोदींवर टीका

**औरंगाबाद-** मी नोटबंदी नंतर चुकीचा निर्णय म्हणून पहिल्यांदा बोललो आता ते सगळे सत्य समोर आलंय. केवळ एका माणसाच्या हट्ट पायी सगळी नुकसान झाले अशी टीका मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर केली. मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे मराठवाड्याच्या दौऱ्यावर आहे. आज औरंगाबादमध्ये राज ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेऊन मोदी सरकारवर एकच हल्लाबोल केला. मोदींनी नोटबंदी लागू गेली आणि आता त्यांचं सत्य बाहेर आलंय. रिझर्व्ह बँकेनंच पैसे किती परत आले याबद्दल उघड केलंय. हे मीही याआधी बोललो होतो फक्त एका माणसाच्या हट्टामुळे सर्वांचं नुकसान झालं अशी टीका राज ठाकरेंनी केली.



मराठा आंदोलनादरम्यान वाळूज एमआयडीसीमध्ये परप्रांतीयांनी तोडफोड केली होती आणि हे पोलिसांनीही स्पष्ट केलं. त्यामुळे या तोडफोडीचा मराठा आंदोलकांशी काहीही संबंध नव्हता असंही राज ठाकरेंनी यावेळी सांगितलं. माओवादी संबंधीत पाच जणांना अटकेबद्दल राज ठाकरेंनी भाष्य केलं. लोकशाही टिकवण्यासाठी वेगवेळ्या विचारांची आवश्यकता असावीच लागते अमर्त्य सेन म्हणतात ते खरे आहे भारताची लोकशाही अडचणीत आहेच आपल्याला आता विचार करावाच लागेल असंही राज ठाकरे म्हणाले.

## मुंबई एअरपोर्टचं नाव आता छत्रपती शिवाजी 'महाराज' आंतरराष्ट्रीय विमानतळ

**मुंबई-** मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नावात सुधारणा करण्यात आली आहे. 'छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ' असा शिवरायांचा पूर्ण उल्लेख नावात करण्यात आला आहे. यापूर्वी मुंबईतील इंटरनॅशनल एअरपोर्टला छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ म्हटलं जात होतं. मात्र आता त्यात 'महाराज' या शब्दाची भर घालण्यात आली आहे. नागरी हवाई उड्डाण मंत्री सुरेश प्रभू यांनी ट्विटरवरुन यासंदर्भात माहिती दिली. महाराष्ट्रातील जनतेने यासंदर्भात कित्येक वर्षांपासून मागणी केली होती. ती अखेर पूर्ण झाल्याबद्दल प्रभूंनी महाराष्ट्रीय नागरिकांचं अभिनंदनही केलं.



## राज्यातील ३ शहरांत नक्षलवादविरोधी कक्ष

**मुंबई-** नक्षलवादाची बीजे शहरी भागांतही रुजत असल्याच्या पार्श्वभूमीवर दहशतवाद विरोधी पथकाच्या एटीएस धर्तीवर राज्यात नक्षलवादविरोधी कक्ष सुरू करण्याचा गृह विभागाचा विचार आहे. मुंबई, पुणे आणि औरंगाबाद येथे हे कक्ष स्थापन करण्यात येण्याची शक्यता असल्याचे सूत्रांनी सांगितले.



दुर्गम भागांतील नक्षलवाद शहरी भागातही पसरत असल्याचे उघड होत आहे. महाराष्ट्र 'एटीएस'च्या पथकाने काही महिन्यांपूर्वी मुंबई परिसरातून काही संशयित नक्षलवाद्यांना अटक केली होती. ते सांकेतिक शब्दांचा वापर करत असल्याचे तपासात उघड झाले होते. या पार्श्वभूमीवर शहरी भागांत फोफावू पाहणाऱ्या नक्षलवादाचा बीमोड करण्यासाठी राज्यातील प्रमुख शहरांत हे कक्ष सुरू करण्याचा गृह विभागाचा विचार आहे. गडचिरोलीसारख्या भागांत नक्षलवाद्यांशी दोन हात करताना पोलिसांना सावधगिरी बाळगावी लागते. तेथे 'आयईडी' स्फोटके आणि भूसुरुंगांचा धोका असतो. या पार्श्वभूमीवर गृह विभागाने लष्कराच्या जबलपूर येथील कारखान्यात तयार केलेली विशेष वाहने खरेदी केली आहेत. घनदाट जंगलात नजर ठेवण्यासाठी उच्च क्षमतेच्या ड्रोनचा वापर होत असल्याची माहितीही सूत्रांनी दिली.

# नोटाबंदीनंतर १५ लाख कोटींच्या जुन्या नोटा परत

**नवी दिल्ली-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अचानक घेतलेल्या नोटाबंदीच्या निर्णयानंतर चलनातून बाद झालेल्या तब्बल ९९.३० टक्के म्हणजे १५ लाख कोटींच्या जुन्या नोटा रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे जमा झाल्या आहेत. केवळ १३ हजार कोटी रुपयांच्या नोटा बँकेत आल्या नाहीत. बँकेचा २०१७-१८ चा वार्षिक अहवाल आज सादर झाला असून त्यातील आकडेवारीवरून नोटाबंदीचा निर्णय फसल्याची टीका काँग्रेससह विरोधी पक्षांनी केली आहे तर नोटाबंदीच्या निर्णयामागील सर्व हेतू साध्य झाल्याचा दावा भाजपने केला आहे.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचा २०१७-१८ चा वार्षिक अहवाल प्रकाशित करण्यात आला. आरबीआयने यासंबंधी ट्विट करून सविस्तर अहवाल पाहण्यासाठी लिंक दिली आहे. या अहवालात गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत यंदा भारताच्या अर्थव्यवस्थेत सुधारणा झाल्याचे म्हटले आहे. देशात गुंतवणूक आणि उत्पादनाचे प्रमाण वाढले असून महागाई काही प्रमाणात कमी झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. अप्रत्यक्ष कर प्रणालीत जीएसटी मैलाचा दगड ठरल्याचे अहवालात म्हटले आहे.

दरम्यान, नोटाबंदीच्या निर्णयामुळे काळ्या पैशाला आळा, दहशतवादाला मिळणाऱ्या निधीत घट, नक्षलवाद कमी होईल, हे सर्व उद्देश साध्य झाल्याचा दावा सरकारकडून करण्यात आला आहे; परंतु हा दावा फोल आहे. नोटाबंदीमुळे लाखो लोकांचा रोजगार गेला. नोटा बदलून घेण्यासाठी बँकांपुढे लागलेल्या रांगांमध्ये शंभरहून अधिक लोकांचा मृत्यू झाला.



## नाशिककर एकवटले... तुकाराम मुंढेंविरोधातला 'अविश्वास' बारगळला

**नाशिक-** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानंतर नाशिक भाजपाचे महापौर आणि नगरसेवकांनी नमती भूमिका घेतलीय. मुंढेंविरोधातला अविश्वास ठराव मागे घेण्याचा निर्णय भाजपाच्या नगरसेवकांनी घेतलाय. मुख्यमंत्र्यांनी केलेल्या हस्तक्षेपानंतर आज सकाळी झालेल्या बैठकीत अविश्वास ठराव मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आलाय. याबद्दल बोलताना, तुकाराम मुंढेंविरोधातला अविश्वास प्रस्ताव मागे घेणार असून चर्चेतून मार्ग काढणार असल्याचं नाशिकच्या महापौर रंजना भानसी यांनी बोलताना सांगितलंय. आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या समर्थनार्थ आम्ही नाशिककर वॉक फॉर कमिशनर असा मोर्चा काढणार होते त्याला स्थानिक मुंबई नाका पोलिसांनी लेखी स्वरूपात परवानगी नाकारली आहे. मात्र, तरीही 'आम्ही नाशिककर' या बॅनरखाली एकत्र आलेल्या संस्था मोर्चा काढणार आहेत. लोकशाहीत असा हक्क असल्याचे सांगत शेकडो नाशिककर गोल्फ मैदानात जमणार आहेत आणि पालिकेत मोर्चा काढणार आहेत. नाशिककराचा वाढता रोष आणि आज आयोजित करण्यात आलेला वॉक फॉर कमिशनर बघता मुख्यमंत्रयानी थेट अविश्वास प्रस्ताव मागे घेण्याचे आदेश दिले होते. करवाढ लादल्याच्या कारणावरून सत्ताधारी भाजपने पालिका आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या विरोधात दाखल केलेल्या अविश्वास प्रस्तावाची खेळी पक्षावर उलटत आहे हे लक्षात घेऊ स्थानिकांना तो प्रस्ताव मागे घेण्याची सूचना करण्यात आल्या आणि या आदेशांची तत्काळ दखल घेत अविश्वास मागे घेण्याविषयी नगरसेवकांना थेट संदेशही धाडण्यात आलेत.



## पोलीस शिपायाच्या नोकरीसाठी ३,७०० पीएचडीधारक अर्जदा!

# ६२ जागांसाठी ९३ हजार अर्ज

**लखनऊ : उत्तर प्रदेश पोलिसांच्या दळणवळण विभागातील निरोप्या शिपायांच्या ६२ रिक्त जागा भरण्यासाठी तब्बल ९३,५०० अर्ज आले असून त्यापैकी ५० हजारांहून अधिक अर्जदार पदवीधर, २८ हजार पदव्युत्तर पदवीधर तर ३,७०० चक्क पीएचडीधारक आहेत.**

या रिक्त जागा भरण्यासाठी १२ वर्षांनंतर प्रथमच जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात आले. अर्ज करण्याची मुदत १६ ऑगस्ट रोजी संपली. या पदावर नेमल्या जाणाऱ्या व्यक्तीचे काम खात्याचे टपाल आणि निरोप एका कार्यालयातून दुसऱ्या कार्यालयात पोहोचविणे असे आहे. भरती नियमांनुसार या पदासाठी शैक्षणिक अर्हता इयत्ता पाचवी उत्तीर्ण अशी आहे. बेसुमार बेरोजगारीमुळे बाहेर रोजगाराच्या संधी नसल्याने हजारो उच्चशिक्षित उमेदवारांनीही शिपायांच्या या पदासाठी अर्ज केले आहेत. पूर्णवेळ सरकारी नोकरी व महिना २किमान २० हजार रुपये पगार एवढयासाठी हे उच्चशिक्षित तरुण चतुर्थश्रेणीची नोकरी करण्यास तयार आहेत. एकूण ९३,५०० अर्जदारांमध्ये इयत्ता पाचवी ते आठवीपर्यंत शिक्षण झालेले फक्त ७,४०० अर्जदार आहेत. बाकी सर्व किमान शैक्षणिक अऱ्हतेहून कितीतरी जास्त शिकलेले आहेत. त्यापैकी अनेकांनी एमबीए केलेले आहे तर काही बीटेकही झालेले आहेत.

पोलिसांच्या संबंधित विभागातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, पूर्वी या पदासाठी अर्ज करणाऱ्याने सायकल चालविता येते, असे स्वसाक्ष्यांकित हमीपत्र देणे पुरेसे होते. परंतु आता एवढ्या मोठ्या संख्येने उच्चशिक्षितांचे अर्ज आल्याने त्यांना चाळणी लावण्यासाठी कोणती आणि कशी चाचणी घ्यायची हे ठरविण्यात येत आहे.

अतिरिक्त पोलीस महासंचालक (टेलिकॉम) पी. के. तिवारी यांनी सांगितले की, किमान शैक्षणिक अर्हतेहून जास्त शिकलेले आहेत म्हणून आम्ही कोणाचाही अर्ज प्राथमिक फेरीत फेटाळणार नाही. उलट एवढे शिकलेले कर्मचारी खात्याला मिळणे चांगले आहे. त्यांच्याकडून इतर कामेही करून घेतली जाऊ शकतील. ज्यांच्याकडे तांत्रिक कौशल्य आहे त्यांना शिपाई पदावरून लवकर वरची जागा मिळू शकेल.

***बहुसंख्य उमेदवार चांगले शिकलेले***

बहुसंख्य उमेदवार चांगले शिकलेले असल्याने या वेळी प्रथमच या पदासाठी लेखी परीक्षा घेण्याचा आमचा विचार आहे, असे सांगून तिवारी म्हणाले की, परीक्षा पारदर्शी पद्धतीने व्हावी यासाठी हे काम बाहेरच्या संस्थेस देण्याचा विचार आहे.



## सासूने सुनेला गुंगीच्या गोळ्या दिल्या, सासऱ्याने केला अत्याचार; ५ जणांविरुद्ध गुन्हा

**अमरावती-** नागपूरी गेट पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या एका महिलेला सासूने गुंगीचे औषध दिले, त्यानंतर भासऱ्याने अत्याचार केल्याचा खळबळजनक आरोप पीडीत महिलेने पोलिस तक्रारीत केला आहे. या प्रकरणी नागपूरी गेट पोलिसांनी पीडीतेच्या सासू, पती, सासऱ्यासह पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पीडीत महिलेचा काही महिन्यांपूर्वी शहरातील एका व्यक्तीसोबत विवाह झाला होता. त्यानंतर महिलेला पतीसह कुंटूबातील इतरांनी त्रास दिला. तसेच महिलेच्या पतीमध्ये शारिरिक दोष असल्याची बाब तिच्यापासून लपवून ठेवली असल्याचाही आरोप महिलेने केला आहे. दरम्यान, सासूने गुंगीचे औषध दिल्यानंतर सासऱ्याने अतिप्रसंग केला, असा आरोप पीडीतेने केला आहे. त्यानंतर सासरच्या मंडळींनी लग्नात आलेले सर्व दागिने व इतर साहित्य घरात ठेवून घेतले. ते परत मागितले असता दिले नाही, असेही पीडीतेने तक्रारीत नमूद केले आहे. या प्रकरणी नागपूरी गेट पोलिसांनी बलात्कार, मारहाण, तसेच विवाहितेचा छळ करणे या कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

## वर्धा जिल्ह्यात शिक्षिकेची विद्यार्थिनीला केस ओढून मारहाण

**वर्धा-** हिंगणघाट तालुक्यातील स्थानिक नगरपरिषदेच्या जी.बी.एम.एम हायस्कूलमध्ये ९ व्या वर्गात शिकणाऱ्या एका विद्यार्थिनीला शिक्षिकेने केस धरून मारहाण केल्याची २३ ऑगस्ट रोजी घडली. संबंधित विद्यार्थिनीच्या पालकांनी २८ ऑगस्टला केलेल्या तक्रारीनुसार पोलिसांनी या घटनेची नोंद अदखलपात्र गुन्हा अशी घेतली आहे.

सदर विद्यार्थिनी व तिची मैत्रीण वर्ग सुरु असताना लघुशंकेसाठी गेल्या व परत आल्या. मात्र वर्ग सुरू असताना बाहेर पडण्याच्या त्यांच्या कृतीमुळे संतप्त झालेल्या शिक्षिकेने या दोघींपैकी एकाला दमदाटी केली तर दुसरीचे केस ओढून तिला आपटले व मारहाण केली. शाळा सुटल्यावर मुलीला




घेण्यासाठी आलेल्या पालकांना हा प्रकार समजल्यावर त्यांनी संबंधित शिक्षिकेकडे विचारणा केली.

## केंद्रीय कर्मचाऱ्यांना खूशखबर महागाई भत्त्यात दोन टक्के वाढ

**नवी दिल्ली-** केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात दोन टक्क्यांनी वाढ करण्याचा निर्णय केंद्रीय मंत्रिमंडळाने घेतला. ही वाढ १ जुलै २०१८ पासून लागू होणार असून त्याचा लाभ ४८.२१ लाख कर्मचारी आणि ६२.०३ लाख निवृत्तीवेतनधारकांना मिळणार आहे. ज्या प्रमाणात महागाईचा दर वाढतो, त्या प्रमाणात निवृत्तीवेतनधारक व कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता दिला जातो. किरकोळ महागाईच्या दराशी या



भत्त्याची सांगड असते. दिल्लीत बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीत केंद्रीय कर्मचारी व निवृत्तीवेतन धारकांच्या महागाई भत्त्यात दोन टक्क्यांनी करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे महागाई भत्त्याचे प्रमाण आता सातवरून नऊ टक्क्यांवर पोहोचले आहे. या वाढीमुळे सरकारी तिजोरीवर वर्षाला ६,११२ कोटी रुपयांचा भार पडणार आहे.


आश्रय सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट

आश्रय सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट व सेव्हन हिल्स हॉस्पिटल अंधेरी यांच्या संयुक्त विद्यमानाने समाजातील व गरीब लोकांसाठी किडनी, कॅन्सर, हृदयरोग, ब्रेन आदी रोगांवर निःशुल्क शस्त्रक्रिया करुन देण्यात येईल. केवळ केसरी आणि पिवळे रेशनकार्डधारक असणाऱ्यांनाच या सेवेचा लाभ मिळेल.

संस्थापकः- श्री. दीपक मोरेश्वर नाईक, मो. ८४२४९८९८९८

email:deepakmnaik@gmail.com, manavadhikar@gmail.com, www.ashraytrust.com


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)